महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या विधी सल्लागार या पदावर श्री. प्रमोद माधव बाडीगी, न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.बाहआ-२०१४/ प्र.क्र.४०/ का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ०२ डिसेंबर, २०१७

वाचा- १) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे पत्र जा. क्र. बाहआ-२०१७/ प्र क्र ४४/३५६, दिनांक- ०६ ऑक्टोबर, २०१७
२) विधी व न्याय विभागाचे पत्र क्र. संकीर्ण१११७/६८३/प्र क्र ११७/का-३, दि. ११ ऑगस्ट,२०१७

प्रस्तावना-

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २००७ अन्वये झाली आहे. त्यानुसार आयोगाचे प्रशासकीय कामकाजासाठी १२ पदे निर्माण करण्याचा शासन निर्णय दिनांक २८ जानेवारी, २००९ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार आयोगाच्या आस्थापनेवर विधी सल्लागार या रिक्त पदी विधी अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई यांच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या विधी सल्लागार या पदी श्री. प्रमोद माधव बाडीगी, न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांची प्रतिनियुक्तीने दोन (२) वर्षांच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

२. श्री. प्रमोद माधव बाडीगी, न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांची सदर प्रतिनियुक्ती ही प्रतिनियुक्तीच्या पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून २ वर्षांच्या कालावधीकरिता असेल.

अ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनास आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

ब) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर, त्यांच्या सेवा परत करण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील.

क) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे, अशी कमीत कमी ३ महिन्यांची लेखी नोटीस शासनाला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

३. सदर प्रतिनियुक्ती ही महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून करण्यात येत आहे. श्री. प्रमोद माधव बाडीगी, यांना प्रतिनियुक्तीच्या काळात प्रतिनियुक्ती भत्ता देय राहणार नाही.

४. श्री. प्रमोद माधव बाडीगी, यांना प्रतिनियुक्तीच्या पदी रुजू होण्याकरिता विधी व न्याय विभागाकडून कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांनी श्री. नांदगांवकर यांना सदर पदावर रुजू करुन घ्यावे व तसा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

५. श्री. प्रमोद माधव बाडीगी, यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती तसेच पदाची श्रेणीवाढ करण्याचे आदेश आवश्यकतेनुसार विधी व न्याय विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने काढण्यात येतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलाअसून, त्याचा सांकेतांक क्र. २०१७१२०२१६१९४१६३३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2017.12.02 16:21:44 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री / राज्यमंत्री महिला व बाल विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (म व बा वि) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई.
१०. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
११. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ / २, (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. श्री. प्रमोद माधव बाडीगी, न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई
१६. उप सचिव (सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (का-९)